Maharashtra State
महाराष्ट्र शासन

Services Preparatory Institute,
सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था

N-12 Sector, Cidco, Chh Sambhajinagar Phone No 0240-2991370
एन-१२ सेक्टर,सिडको,छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र.०२४०-२९९१३७०
Web site :www.spicsn.com E mail : sanchalak.spi-csn@mah.gov.in

विवक्षित कामासाठी करार पद्धतीने नेमणुक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याच्या कर्तव्याचे स्वरूप व इतर अटी व शर्ति

अ. **विवक्षित कामाचे/जबाबदारीचे स्वरूप** :-

i. संचालकांच्या आदेशानुसार शासकीय व इतर पत्रव्यवहार व प्रशिक्षणाशी निगडीत कामे करणे.

ii. संस्थेत भेटीकरिता येणाऱ्या आगंतुकांच्या प्रवेशासंबधीत शंकेचे निरासण करणे.

iii. संस्थेद्वारे दाखल करण्यात आलेल्या विविध प्रस्तावावर संबधित विभागाशी संपर्क साधणे.

iv. गृहपाल यांच्या अनूपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासंबधीची व प्रशासकीय स्तरावरील संपुर्ण कामे पहाणे.

v. संस्थेद्वारे दिले जाणारे प्रशिक्षण हे सैन्यदलातील धर्तीवर देण्यात येत असल्यामूळे आवश्यकतेनुसार काम-काजाच्या वेळेत बदलानुसार हजर राहण्याची तयारी ठेवणे.

vi. शासन स्तरावर दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावावर संपर्क साधुन प्रकरणे मार्गी लावणे.

vii. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त करण्यात येणाऱ्या विविध कामात मदत करणे व संबधितांशी संपर्क साधुन कामे मार्गी लावणे.

viii. नाशिक येथील मुलींच्या संस्थेतील काम पार पाडण्यास मदत करणे.

ix. संस्थेच्या संकेतस्थळावर डेटा वेळो-वेळी अपडेट करणे.

x. संस्थेच्या संकेतस्थळावर टाकण्यासाठी FAQ व व्हॉट्सॲप चॅटबोट सुविधा विकसीत करणे.

आ. **इतर अटी व शर्ति**

i. विवक्षित कामासाठी करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी व नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याबाबत बंधपत्र/हमीपत्र द्यावे लागेल.

पान नं. २ वर

Services Preparatory Institute Govt Maha Chh. Sambhajinagar

ii. सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती ही एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी राहील, आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल.

iii. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत कार्यरत राहू शकेल.

iv. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणारा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

v. करार पद्धतीने नियुक्त होण्याकरिता सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

vi. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी नसून केवळ विवक्षित कामासाठी करण्यात येईल.

vii. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

viii. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

ix. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यवसायीक कामात गुंतलेली नसावी.

x. करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

xi. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

xii. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

xiii. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

इ. **<u>मासिक पारिश्रमिक व भत्ते</u>** :-

जाहिराती मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १० जून २०२५ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करून मासिक पारिश्रमिक व भत्ते यांची गणना करण्यात येईल व प्रदान करण्यात येतील.

टिप : उमेदवाराने अर्ज करतेवेळी कर्तव्ये/जबाबदाऱ्या व अटी व शर्ति मान्य असल्याचे अर्जात नमूद करावे.

संचालक
सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था

Services Preparatory Institute
Govt Maha
Ch. Sambhajinagar

D: Folder Contact basis Gp B SPI